<u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गाच्या</u>

# विद्युतीकरण व संकर्षण कामाकरिता निवीदाकारांचा भरघोस प्रतिसाद

मुंबई, 23 जानेवारी 2016 : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-3 मार्गाचे विद्युतीकरण आणि संकर्षणाच्या (ट्रॅक्शन) कामाकरिता विद्युत क्षेत्रातील नामांकित कंपन्यांकडून मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशनला (मुं.मे.रे.कॉ) भरघोस प्रतिसाद मिळाला.

पूर्व अर्हता बैठकीला विद्युत क्षेत्रातील सात नामांकित कंपन्यानी हजेरी लावली. ज्यामध्ये मे. लार्सन टुब्रो, मे. वोल्टाज, मे. आलस्टोम, मे. टाटा प्रोजेक्ट लि., मे. सिमन्स लि., मे. टी.बी.ई.ए एनर्जी इंडीया प्रा. लि. यांचा समावेश होता.

बैठकी विषयी माहिती देताना मुं.मे.रे.कॉच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, मुंबईला सुरक्षित व आरामदायी प्रवास देणे हा या आमचा उद्देश आहे. प्रकल्पाला गतीने पुढे नेण्याकरिता मुं.मे.रे.कॉ. आणि कंपनी प्रतिनिधींमध्ये बैठकी दरम्यान सकारात्मक चर्चा झाली.

विद्युतीकरणाचे काम दोन पॅकेजमध्ये विभागलेले आहे. पहिल्या पॅकेजमध्ये उपरी संकर्षण प्रणाली (ओव्हरहेड ट्रॅक्शन सिस्टीम), सहाय्यकारी उपकेंद्रे (ऑक्सलरी सबस्टेशन), केबल वितरण जाळे (केबल डिस्ट्रीब्युशन नेटवर्क) आदी कामांचा समावेश राहील तर दुसऱ्या पॅकेज मध्ये मुख्य स्थानकाचे विद्युतीकरण, 110 केव्ही केबलींग, सहाय्यकारी स्वीचन केंद्र (ऑक्सलरी स्वीचिंग स्टेशन), स्काडा आदी कामे अंतर्भूत असतील. भुयारी प्रकल्पासाठी स्काडा सारख्या अद्ययावत यंत्रणेचा वापर करण्यात येणार आहे.

पूर्व अर्हता निवीदा दस्तावेज मुं.मे.रे.कॉच्या www.mmrcl.com या संकेतस्थळावर 2500 रूपये ना परतावा निवीदा शुल्क जमा केल्यावर 22 फेब्रुवारी 2016 पर्यंत उपलब्ध होऊ शकेल. पूर्व अर्हता निवीदा 23 फेब्रुवारी 2016 पर्यंत सादर करता येईल.